REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 15 | ISSUE - 8 | MAY - 2026

# विनाअनुदानित माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या आर्थिक स्थितीचा समाजशास्त्रीय अभ्यास : विशेष संदर्भ सोलापूर जिल्हा

**श्री. महादेव सदाशिव डिसले**
पीएच. डी.,संशोधक विद्यार्थी

**प्रा. डॉ. रामेश्वर मोरे**
संशोधन मार्गदर्शक तथा प्राध्यापक,
संतोष भीमराव पाटील कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,मंद्रूप.

**गोषवारा (Abstract):**



कार्ल मार्क्स यांनी समाजातील आर्थिक असमानतेचे विश्लेषण करताना *वर्गसंघर्षाच्या संकल्पनेवर* विशेष भर दिला आहेत्यांच्या मते ., शोषणविरहित आणि वर्गविरहित समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी संघर्ष आणि परिवर्तनाची प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची ठरतेसमाजात सत्ता ., संपत्ती आणि अधिकार यांचे असमान वितरण अस्तित्वात असेपर्यंत सत्ताधारी व सत्ताहीन तसेच संपत्तीधारी व संपत्तीहीन गटांमध्ये संघर्ष सततत्याने सुरू राहतो .मार्क्स यांनी सामाजिक वास्तव समजून घेण्यासाठी द्वंद्वात्मक भौतिकवादाचा दृष्टीकोन स्वीकारलाया . दृष्टीकोनाच्या आधारे विचार केल्यास विनाअनुदानित शाळांमधील शिक्षकांची आर्थिक संरचनेशी निगडित असल्याचे स्पष्ट-आर्थिक स्थिती ही व्यापक सामाजिकहोतेमानवी गरजा ., श्रम आणि उत्पन्न यांच्यातील परस्परसंबंध लक्षात घेता प्रस्तुत अध्ययनामध्ये विनाअनुदानित माध्यमिक शाळांमधील शिक्षकांच्या आर्थिक स्थितीचे विविध पैलूंवर आधारित विश्लेषण करण्यात आले आहे.

अध्ययनातून असे निदर्शनास येते की, विनाअनुदानित शाळांमध्ये कार्यरत माध्यमिक शिक्षकांची आर्थिक स्थिती प्रामुख्याने अस्थिर व चिंताजनक आहेनियमित व समाधानकारक वेतनाचा अभाव ., सेवासुरक्षेची कमतरता तसेच विविध सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ न मिळणे ही या स्थितीची प्रमुख वैशिष्ट्ये आहेतअनेक शिक्षकांना त्यांच्या शैक्षणि.क पात्रता व अनुभवाच्या तुलनेत अपेक्षित मानधन मिळत नसल्यामुळे त्यांच्यात आर्थिक असुरक्षिततेची भावना निर्माण होते.या आर्थिक अस्थैर्याचा परिणाम शिक्षकांच्या व्यावसायिक समाधानावर तसेच अध्यापनाच्या गुणवत्तेवर होण्याची शक्यता नाकारता येत नाहीपरिणामी ., विनाअनुदानित शाळांमधील शिक्षकांच्या आर्थिक समस्या या केवळ वैयक्तिक स्तरावर मर्यादित न राहता संपूर्ण शैक्षणिक व्यवस्थेच्या स्थैर्यावर परिणाम करणाऱ्या ठरतात.

सदर संशोधन लेखातून संशोधकानेसोलापूर जिल्ह्यातील विनाअनुदानित माध्यमिक शाळांच्या सद्यस्थितीचा अभ्यास करताना विनाअनुदानित माध्यमिक शाळांतील शिक्षकांनाज्या विविध आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागते यासंदर्भाने प्रकाश टाकण्यात आलेला आहे प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने.वर्णनात्मक आराखडा या पद्धतीचा वापर केला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने सोईस्कर नमुना निवड पद्धतीने सोलापूर जिल्ह्यातील विनाअनुदानित माध्यमिक शाळांमधील ३०० विनाअनुदानित शिक्षकांच्या आर्थिक स्थितीचा प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने विचार केलेला आहे .संशोधकाने अनुसूची या साधनाचा वापर माहिती संकलन करण्यासाठी केला आहेत्यातून प्राप्त निष्कर्षांपैकी मुख्य निष्कर्ष असा की., विनाअनुदानित माध्यमिक शिक्षकांच्या बहुतेक अडचणींचा केंद्रबिंदू आर्थिक असुरक्षितता आहे .शिक्षकांना आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक व मानसिक अशा विविध स्तरांवर एकाच वेळी अडचणींचा सामना करावा लागतो .सततच्या संघर्षामुळे शिक्षकांमध्ये मानसिक तणाव, चिंता व आत्मसन्मानाची घसरण दिसून येते.आर्थिक अडचणींमुळे शिक्षक अनेकदा कर्जाच्या दुष्चक्रात अडकतात त्यामुळे **कर्जबाजारीपणाचा वाढता धोका ही मुख्य समस्या ठरते.**

**मुख्य शब्द (Key Wards) :** *विनाअनुदान, माध्यमिक शाळा, शिक्षक, आर्थिक स्थिती, समाजशास्त्रीय अभ्यास .*

**प्रस्तावना :**

विनाअनुदानित शाळांमध्ये कार्यरत असलेल्या माध्यमिक शिक्षकांची आर्थिक स्थिती प्रामुख्याने अस्थिर व चिंताजनक असल्योच नियमित व समाधानकारक वेतनाचा अभाव .आढळून येते, सेवा सुरक्षेची कमतरता आणि विविध सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ न मिळणे इत्यादी या स्थितीची प्रमुख वैशिट्ये मानली जातातअनेक शिक्षकांना त्यांच्या शैक्षणिक पात्रता व अनुभवाच्या तुलनेत अपेक्षित. त्यामुळे त्यांच्यात आर्थिक असुरक्षिततेची भावना न.मानधन मिळत नाहीिर्माण होतेया परिस्थितीचा परिणाम त्यांच्या व्यावसायिक . त्यामुळे विनाअनुदानित शाळांमधील शिक्षकांच्या आर्थिक समस्या.समाधानावर तसेच अध्यापनाच्या गुणवत्तेवर होण्याची शक्यता असते केवळ वैयक्तिक मर्यादेत न राहता संपूर्ण शैक्षणिक व्यवस्थेच्या स्थैर्यावर परिणाम करणाऱ्या ठरतात .

.डॉ .समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून या स्थितीचे विश्लेषण करताना आर्थिक रचना आणि श्रम या प्रक्रियेचा विचार महत्वाचा ठरतो मुखर्जी यांच्या मतानुसार'भारतीय समाजशास्त्राने 'निदनात्मक समाजशास्त्र' विसकसित कार्याच्या प्रक्रियेत मार्क्सवादी दृष्टीकोण विशेषता उपयुक्त ठरतो.आणि तिचा थेट संबंध उत्पादन प्रक्रियेशी असतो.समाजातील श्रमविभाजन ही महत्वपूर्ण आर्थिक संस्था मानली जाते.' कोणत्याही समाजातील उत्पादनाचे स्वरूप समजून घेण्यासाठी त्या समाजातील लोकांच्या गरजांची पातळी आणि स्वरूप समजूनघेणे आवश्यक असते या गरजांच्या पूर्ततेसाठी लोक जे कार्य किवा श्रम करतात त्यालाच.'उत्पादनात्मक कार्य किंवा उत्पादक श्रम' असे संबोधले जातेत्यामुळे मानवी गरजा., श्रम आणि उत्पन्न यांच्यात परस्परांचे घनिष्ट संबंध असल्याचे स्पष्ट होते

कार्ल मार्क्स यांनी समाजातील आर्थिक असमानतेचे विश्लेषण करताना वर्गसंघर्षाच्या संकल्पानेवर विशेष भर दिला आहे. त्यांच्या मते, 'शोषणविरहित आणि वर्गविरहित समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी संघर्ष आणि परिवर्तनाची प्रक्रिया महत्वाची असते. समाजात सत्ता, संपत्ती आणि अधिकार यांचे असमान वितरण अस्तित्वात असेपर्यंत सत्ताधारी आणि सत्ताहीन, तसेच संपत्तीधारी आणि संपत्तीहीन गटांमध्ये संघर्ष सुरू राहतो मार्क्स यांनी सामाजिक वास्तव समजून घेण्यासाठी द्वंद्वात्मक भौतिकवादी दृष्टीकोणाचा उपयोग केला. या दृष्टीकोनाच्या आधारे पाहिले असता विनाअनुदानित शाळांमधील शिक्षकांचीआर्थिक स्थिती ही व्यापक सामाजिकआर्थिक संरचनेशी - माणसाच्या गरजा .संबंधित असल्याचे स्पष्ट होते, श्रम, उत्पन्न यांचा जवळचा संबंध आहे, म्हणून प्रस्तुत अध्ययनात विनाअनुदानित माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन विविध पैलूंच्या आधारे केले आहे .

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१. महाराष्ट्र शासनाच्या विनाअनुदान धोरणाचे अध्ययन करणे.
२. विनाअनुदानित माध्यमिक शाळांतील शिक्षकांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
३. विनाअनुदानित माध्यमिक शाळांतील शिक्षकांसमोरील आर्थिक समस्यांचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहीतकृत्य :**

विनाअनुदानित माध्यमिक शाळांतील कार्यरत असणाऱ्याशिक्षकाना अल्प मानधनामुळे विविध आर्थिक समस्यांचा सामना करावा लागतो.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधात विनाअनुदानित माध्यमिक शाळांतील कार्यरत असणाऱ्याशिक्षकांच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन करण्यासाठी नमुना निवड पद्धतीतील साधा यादृचिक नमूना निवडीद्वारे सोलापूर जिल्ह्यातील ६० विनाअनुदानित माध्यमिक शाळांमधील ३०० शिक्षकांची निवड करून अनुसूची व निरीक्षण तंत्राच्या माध्यमातून प्राथमिक तथ्यांचे संकलन करण्यात आले. दुय्यम तथ्यासाठी संदर्भ ग्रंथ, संशोधन अहवाल, विनाअनुदानित माध्यमिक शाळा तसेच शिक्षकांसंदर्भात विविध वर्तमानपत्रात, मासिकांमध्ये छापून आलेल्या लेखांचा पण संशोधकाने आवश्यक तेथे उपयोग करुन घेतला तसेच ग्रंथालयातील पुस्तकांचा उपयोग करण्यात आला संकलित तथ्यांचे संख्यात्मक व गुणात्मक विश्लेषण करून निष्कर्ष मांडण्यात आले आहेत.

**अल्प मानधनामुळे समस्या :**

सद्य:स्थितीमध्ये समाजामध्ये कोणतीही व्यक्ती नोकरी अथवा व्यवसाय करत असेल तर त्यातून त्याला त्यांनी केलेल्या कष्टाचा मोबदला म्हणून पगार अथवा मानधन देणे आवश्यक आहे. हा पगार अथवा मानधन काही ठिकाणी अधिक तर काही ठिकाणी अत्यंत कमी असते. असे असले तरी व्यक्तीच्या स्वतःच्या आणि कुटुंबाच्या दैनंदिन गरजा व उदरनिर्वाह पूर्ण करण्यासाठी ती व्यक्ती नोकरी व्यवसाय काम धंदा करत असते ज्यांना कामाच्या ठिकाणी मिळणारे मानधन हे अत्यंत अल्प स्वरूपाचे असते. त्यांना कौटुंबिक व सामाजिक जीवनात विविध समस्यांना सामोरे जावे लागते विविध आव्हानांचा सामना करावा लागतो.

**तक्ता क्रमांक : १ उत्तरदात्याला अल्प मानधनामुळे येणाऱ्या समस्यांची माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ. क्र. | जाणवणारी समस्या | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| १ | आर्थिक समस्या | १२६ | ४२.००% |
| २ | कौटुंबिक समस्या | ७६ | २५.३३% |
| ३ | समाजात मानाचे स्थान मिळत नाही | ३६ | १२.००% |
| ४ | गरजा पूर्ण करू शकत नाही | ६२ | २०.६६% |
| | **एकूण** | **३००** | **१००** |

वरील तक्तावरून असे दिसून येते की, प्रस्तुत अध्ययनासाठी निवडलेल्या एकूण ३०० उत्तरदात्यांपैकी सर्वाधिक म्हणजे १२६ (४२.००%) उत्तरदात्यांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागते असा प्रतिसाद त्यांनी दिला. तर त्या खालोखाल माध्यमिक शाळेतील विनाअनुदानित शिक्षकांना मिळणाऱ्या अल्प मानधनामुळे विविध स्वरूपाच्या कौटुंबिक समस्यांना सामोरे जावे लागते असे७६ म्हणजे २५.३३% उत्तरदाते मत नोंदवतात तर ६२ म्हणजे २०.६६% उत्तरदाते माध्यमिक शिक्षक आपल्याला मिळणाऱ्या अल्पमानधनामुळे गरजा पूर्ण करू शकत नाहीत असा प्रतिसाद देतात. तर ३६ म्हणजेच १२.०० टक्के उत्तरदात्या माध्यमिक शिक्षकांच्या मतानुसार त्यांना मिळणाऱ्या अल्पमानधनामुळे समाजात त्यांना मानाचे किंवा प्रतिष्ठेचे स्थान मिळत नाही या समस्येचा सामना त्यांना वारंवार करावा लागतो असे त्या उत्तरदात्यांचे मत आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, सोलापूर जिल्ह्यात विनाअनुदानित माध्यमिक शाळेमध्ये कार्यरत शिक्षकांपैकी आर्थिक समस्यांचा सामना कराव्या लागणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण सर्वाधिक आहे तर अल्प मानधनामुळे गरजा पूर्ण करू शकत नाही असे मत व्यक्त करणाऱ्या शिक्षकाचे प्रमाणही खूप जास्त असल्याचे दिसून येते. त्या खालोखाल अल्प मानधनामुळे उत्तरदात्या माध्यमिक शिक्षकांना विविध स्वरूपाच्या कौटुंबिक समस्यांना सामोरे जावे लागण्याचे प्रमाणही लक्षणीय आहे तर प्रतिसादक उत्तरदात्यांपैकी१२.००% म्हणजे निम्म्या उत्तरदात्या शिक्षकांना अल्प मानधनामुळे समाजात प्रतिष्ठेचे अथवा मानाचे स्थान मिळत नसल्याच्यासमस्येला सामोरे जावे लागते.

यावरून असा निष्कर्ष काढता येतो की, सोलापूर जिल्ह्यातील विनाअनुदानित माध्यमिक शिक्षकांची परिस्थिती केवळ आर्थिकच नाही तर सामाजिक, कौटुंबिक आणि मानसिक अशा वेगवेगळया स्तरावर विविध समस्या, आव्हाने परिणाम करणारी आहे. विनाअनुदानित माध्यमिक शाळेतील शिक्षकांना सामोरे जावे लागणाऱ्या समस्या परस्परसंबंधित आणि परस्परावलंबी आहेत. त्यापैकी आर्थिक समस्या या त्या सर्वांचे मूळ असल्याचे दिसून येते. त्यातूनच पुढे शिक्षकांच्या वैयक्तिक व कौटुंबिक गरजा पूर्ण होणे वेगवेगळया स्वरूपाच्या कौटुंबिक अडचणी निर्माण होणे सामाजिक प्रतिष्ठेचा अभाव असणे यासारख्या समस्या उद्भवतात व त्या आव्हानांचा शिक्षकांना वारंवार सामना करावा लागतो.

**आर्थिक अडचणी :**

विनाअनुदानित माध्यमिक शिक्षकांना त्यांच्या कमी मानधनामुळे सततभेडसावणाऱ्या समस्यांमध्ये विविध आर्थिक अडचणी ही सर्वात मूलभूत आणि सर्वव्यापी समस्या आहे. या समस्येचा अनुभव जवळपास प्रत्येक शिक्षकाला येत आहे. यामध्येदैनंदिन खर्चाची पूर्तता करणे, बचतीची सोय नसणे, कर्जाचा वाढता बोजा, अनिश्चित आर्थिक भविष्य अशा विविध बाबींचा विचार करावा लागतो. शिक्षकांसारख्या महत्त्वाच्या व्यवसायात असणाऱ्या व्यक्तींना या पातळीवर दैनंदिन आर्थिक संघर्ष करावा लागणे हे शिक्षण व्यवस्थेतील विषमतेचे ठळक उदाहरण आहे. म्हणून प्रस्तुत अध्ययनात विनानुदानित माध्यमिक शिक्षक म्हणून कार्यरत असणाऱ्या उत्तरदात्यांना वेळोवेळी कोणकोणत्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो याविषयीच्या सद्य:स्थितीच्या अध्ययन करणे महत्त्वाचे वाटले. प्रस्तुत

अध्ययनासाठी निवडलेल्या ३०० उत्तरदात्यांचे माध्यमिक शिक्षक म्हणून त्यांना वेळोवेळी जाणवणाऱ्या आर्थिक अडचणींच्या सद्य:स्थितीचे अध्ययन केले असता खालीलप्रमाणे तथ्ये प्राप्त झाली.

**तक्ता क्रमांक : २ विनाअनुदानित माध्यमिक शिक्षकांना येणाऱ्या आर्थिक अडचणीची माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ. क्र. | आर्थिक अडचणी | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| १ | मुलांच्या शिक्षणाचा खर्च | ९० | ३०.००% |
| २ | मुलामुलींच्या विवाहाचा खर्च | ५२ | १७.३३% |
| ३ | गंभीर आजारपण/वैद्यकीय खर्च | ३० | १०.००% |
| ४ | गृहकर्ज/इतर कर्जाचे हफ्ते | ११ | ३.६६% |
| ५ | दैनंदिन गरजा पूर्ण न होणे | ३९ | १३% |
| ६ | प्रवास खर्च | ३५ | ११.६६% |
| ७ | घरभाडे | ३१ | १०.३३% |
| ८ | निवृत्तीनंतरची आर्थिक तरतूद | १२ | ४.००% |
| | **एकूण** | **३००** | **१००.००** |

वरील तक्तावरून असे दिसून येते की, विनाअनुदानित माध्यमिक शाळेमध्ये कार्यरत शिक्षक उत्तरदात्यांपैकी मुलांच्या शिक्षणाचा खर्च या आर्थिक अडचणीचा सामना करावा लागतो असे मत व्यक्त करणाऱ्या उत्तरदात्या शिक्षकांचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ९० (३०.००%) इतके आहे. त्याबरोबरच ५२ म्हणजे १७.३३% विनानुदानित माध्यमिक शिक्षकांना मुलामुलींच्या विवाहाचा खर्च या विशेष आर्थिक अडचणीचा सामना करावा लागतो. तर कुटुंबातील सदस्यांचे गंभीर आजारपण, वैद्यकीय सुविधांसाठीचा खर्च ही आर्थिक अडचण जाणवणाऱ्या उत्तरदात्या शिक्षकांचे प्रमाण ३० म्हणजेच १०.००% इतके आहे. तसेच ११ म्हणजे ३.६६% विनाअनुदानित माध्यमिक शिक्षकांना कर्जाचे हप्ते भरण्यासंदर्भात आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो.तर ३९ म्हणजे १३.००% टक्के विनाअनुदानित माध्यमिक शिक्षकांना स्वतःच्या व कुटुंबाच्या दैनंदिन गरजा पूर्ण न होणे या आर्थिक अडचणीचा सामना सतत करावा लागतो. तर३५ म्हणजे ११.६६% विनाअनुदानित माध्यमिक शिक्षकांना दैनंदिन प्रवास खर्च व घर भाडे देणे ही सुद्धा आर्थिक अडचण वाटते१२ म्हणजे ०४.०० % विनाअनुदानित माध्यमिक शाळेतील शिक्षकांना निवृत्तीनंतरची आर्थिक तरतूद ही मोठी आर्थिक अडचण असल्याचे जाणवते. त्याबरोबरच नोकरीसाठी दिलेली देणगी परत न मिळणे, व्यवसाय किंवा जोड धंद्यासाठी गुंतवलेले भांडवलयासाठी सुद्धा विनाअनुदानित माध्यमिक शिक्षकांना वेळोवेळी सामना करावा लागतो असे असल्याचे आपल्याला दिसून येते.

यावरून असे स्पष्ट होते की, सोलापूर जिल्ह्यातील ३०० विनानुदानित माध्यमिक शिक्षकांना वेळोवेळी विविध आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो यामध्ये मुलांच्या शिक्षणाचा खर्च, मुलामुलींच्या विवाहाचा खर्च या आर्थिक अडचणीचा सामना करावा लागणाऱ्या माध्यमिक शिक्षकांचे प्रमाण सर्वाधिक आहे. तर कुटुंबातील सदस्यांचे गंभीर आजार त्यासाठी होणारे वैद्यकीय खर्च ही आर्थिक अडचण असणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ही खूप अधिक आहे. विनाअनुदानित माध्यमिक शिक्षकांना दैनंदिन गरजा पूर्ण न होणे ह्याआर्थिक अडचण याचा सामना करावा लागतो, याचे प्रमाणही बहुतांश आहे. आजच्या सद्य:स्थितीतही दैनंदिन प्रवास खर्च व घर भाडे देणे ही आर्थिक अडचण आहे असे मत व्यक्त करणाऱ्या शिक्षकांचे प्रमाणही लक्षणीय आहे.

यावरून असा निष्कर्ष काढता येतो की, विनाअनुदानित माध्यमिक शाळेतील शिक्षकांना वेळोवेळी विविध अडचणीचा सामना करावा लागतो. यातून त्यांच्या आर्थिक असुरक्षित जीवनातील संघर्षाची तीव्रता त्यांना भेडसावणाऱ्या अडचणींचे भयानक स्वरूप स्पष्टपणे लक्षात येते. यातून केवळ त्यांच्या आर्थिक स्थितीच नाही तर त्यातून निर्माण होणारे सामाजिक आणि भावनिक परिणाम यांचाही त्यांना सामना करावा लागतो. उत्तरदाते माध्यमिक शिक्षकांचे आर्थिक जीवन अत्यंत संघर्षमय, असुरक्षिततेने आणि ताणतणावांनी भरलेले असल्याचे स्पष्ट होते. मुलांचे शिक्षण, आरोग्य, विवाह यासारख्या सामाजिक जबाबदाऱ्यापासून ते दैनंदिन गरजा पूर्ण करण्यापर्यंत आणि निवृत्तीनंतरच्या सुरक्षिततेपर्यंत अनेकदा विविध आर्थिक अडचणीचा सामना विनाअनुदानित माध्यमिक शिक्षकांना करावा लागतो. या अडचणीमुळे ते कर्जाच्या दृष्टचक्रात अडकतात, परिणामी त्यांचा आत्मसन्मान कमी होतो आणि त्यांच्या मानसिकतेवर नकारात्मक परिणाम होतो.

सदर संशोधनातून सोलापूर जिल्ह्यातील विनाअनुदानित माध्यमिक शिक्षकांची परिस्थिती अत्यंत गुंतागुंतीची व बहुआयामी असल्याचे स्पष्ट होतेशिक्षकांना भेडसावणाऱ्या समस्या केवळ आर्थिक मर्यादित नसून त्या सामाजिक., कौटुंबिक व मानसिक पातळीवरही परिणामकारक ठरतात .या संशोधनातील निष्कर्षांनुसार आर्थिक समस्या ही सर्व समस्यांचे मूळ कारण आहेअपुरी व अनियमित वेतनरचना ., नोकरीतील अस्थिरता व आर्थिक सुरक्षिततेचा अभाव यामुळे शिक्षकांना त्यांच्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यात अडचणी येतातपरिणामी ., त्यांच्यावर कर्जबाजारीपणाचे ओझे वाढत जाते.आर्थिक असुरक्षिततेमुळे शिक्षकांच्या कौटुंबिक जीवनावरही प्रतिकूल परिणाम होतो. मुलांचे शिक्षण, आरोग्य, विवाह यांसारख्या मूलभूत जबाबदाऱ्यांची पूर्तता करताना त्यांना सतत संघर्ष करावा लागतोया परिस्थितीतून . कुटुंबात तणाव, मतभेद व असमाधान निर्माण होण्याची शक्यता वाढते .सामाजिक स्तरावरही विनाअनुदानित शिक्षकांना अपेक्षित प्रतिष्ठा मिळत नाहीआर्थिक दुर्बलतेमुळे समाजात त्यांचा दर्जा कमी मानला जातो., ज्यामुळे त्यांच्या आत्मसन्मानावर परिणाम होतो.मानसिक पातळीवर या सर्व समस्यांचा एकत्रित परिणाम होऊन शिक्षक तणाव, चिंता व असुरक्षिततेच्या भावनेने ग्रस्त होतातदीर्घकाळ चालणाऱ्या . .या परिस्थितीमुळे त्यांच्या कार्यक्षमतेवर व अध्यापनाच्या गुणवत्तेवरही परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाहीयावरून असे दिसून येते की, शिक्षकांच्या समस्या परस्परसंबंधित व परस्परावलंबी आहेतआर्थिक समस्या इतर सर्व समस् .यांना जन्म देतात व त्या एकमेकांना अधिक तीव्र बनवतात.

## निष्कर्ष:

सदर संशोधनाच्या आधारे पुढील महत्त्वाचे निष्कर्ष मांडता येतात

१. विनाअनुदानित माध्यमिक शिक्षकांच्या बहुतेक अडचणींचा केंद्रबिंदू आर्थिक असुरक्षितता आहे.
२. शिक्षकांना आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक व मानसिक अशा विविध स्तरांवर एकाच वेळी अडचणींचा सामना करावा लागतो.
३. आर्थिक मर्यादांमुळे कुटुंबातील मूलभूत गरजा पूर्ण करण्यात अडथळे येतात व त्यातून तणावपूर्ण वातावरण निर्माण होते.
४. आर्थिक दुर्बलतेमुळे शिक्षकांना समाजात अपेक्षित मानसन्मान मिळत नाही. म्हणजेच शिक्षकांच्या जीवनात **सामाजिक प्रतिष्ठेचा अभाव आहे.**
५. सततच्या संघर्षामुळे शिक्षकांमध्ये मानसिक तणाव, चिंता व आत्मसन्मानाची घसरण दिसून येते.
६. विनाअनुदानित माध्यमिक शिक्षकांच्या आर्थिक अडचणींमुळे शिक्षक अनेकदा कर्जाच्या दुष्टचक्रात अडकतात. त्यामुळे **कर्जबाजारीपणाचा वाढता धोका ही मुख्य समस्या ठरते.**
७. निवृत्तीनंतरच्या सुरक्षिततेचा अभाव व भविष्यातील अनिश्चितता यामुळे त्यांचे संपूर्ण जीवन असुरक्षिततेने व्यापलेले आहे.

थोडक्यात, सोलापूर जिल्ह्यातील विनाअनुदानित माध्यमिक शिक्षकांचे जीवन अत्यंत संघर्षमय, अस्थिर व तणावपूर्ण असल्याचे स्पष्ट होतेत्यामुळे या .त्यांच्या समस्या केवळ वैयक्तिक नसून त्या शैक्षणिक व्यवस्थेतील व्यापक धोरणात्मक त्रुटींचे द्योतक आहेत. .समस्यांकडे गांभीर्याने पाहून योग्य शासकीय धोरणे व उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे

## संदर्भ ग्रंथ सूची :


१. घाटोळे र.ना. (२००३) समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पद्धती, ८ वी आवृत्ती, नागपूर, श्री मंगेश प्रकाशन.
२. चिटणीस सुमन (२००३) शिक्षण व्यवस्था आणि शिक्षक , पुणे, नित्यनूतन प्रकाशन.
३. आगलावे प्रदिप (२००९) समाजशास्त्रीय संशोधन पद्धती, नागपूर, साईनाथ प्रकाशन.
४. वाखरडे सोनाली (२०११) मूलभूत सामाजिक संस्था, लातूर, अरुणा प्रकाशन.
५. कुलकर्णी प्रभाकर (२००७) सामाजिक विचारप्रवाह , नागपूर, मंगेश प्रकाशन.
६. कुंडले म.बा. (२००३) शैक्षणिक समाजशास्त्र, नागपूर, श्रीविद्या प्रकाशन.
७. टेंभेकर प्रविण (२०१४) लेख-विनाअनुदानित शाळांतील शिक्षकांची पिळवनूकथांबेल का? , दैनिक सकाळ.
८. विनाअनुदानित माध्यमिक शाळांसंदर्भातील विविध शासन निर्णय.